एल.ए. आर.क्र. ७५/२००५
मालावरा वि. चेअरमन
निशाणी क्र. २६

अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ विनयकुमार सुब्बाराव मल्लावार
मी शपथेवर सांगतो की,

<u>साक्षीदाराचा उलटतपास अर्जदारातर्फे सुविज्ञ विधीज्ञ श्री. जी. ए. मोहरीर यांद्वारे -</u>

१. जमीनीचा पुर्वीचा खसरा क्र. ६४ होता. मी आणि माझे वडिल आणि माझे काका असे मिळून वेगवेगळी जमीन खरेदी केली होती. त्यामुळे वेगवेगळे खसरे क्र. पडले. मी वेगवेगळी पिकांची नोंद असलेला ८ अ चा उतारा दाखल केला नाही. न दाखल केल्याचे कोणतेही कारण मी सांगू शकत नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की जमीन ही ओलीत होती. मी धान, सुर्यफुल, गहू यांचे पिक घेत होतो. माझ्या शेतामध्ये विहिर नाही. जमीनीला जलसिंचन मार्फत पाणी घेतले की, त्याचे पैसे द्यावे लागते. मी पाणी विकत घेत असल्याबाबतचे कोणतेही कागद पत्र दाखल केले नाही आणि न दाखल केल्याचे कोणतेही कारण सांगू शकत नाही.

२. माझ्या शेतामध्ये जाण्यासाठी ,माझ्या काकाच्या शेतामधून जावे लागते. माझा काकाच्या शेतीच्या पलीकडे मुख्य रस्ता आहे. सदर रस्ता डुमरी रोड आहे. नांदगाव येथे जाण्यासाठी, डुमरी फाट्टयावरुन , नागपूर जबलपूर हायवे वरुन जावे लागते. साक्षीदार स्वतः सांगतो की, दिड कि.मी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, अडिच कि. मी अंतर आहे. मी डुमरी स्टेशन येथे राहतो. मी नांदगाव येथील राहणा-या लोकांना ओळखतो. मी मोतीराम भोतमांगे यांना ओळखतो. हे मला माहित नाही की, भोतमांगे यांनी त्यांची जमीन सिमा उरकुडे , वर्षा उरकुडे यांना विकली होती. हे मला माहिती नाही की, त्यांची जमीन देखील संपादीत झाली आहे. त्यांनी, जास्त पैसे मिळवे म्हणून अर्ज केल्याचे मला माहित नाही. डुमरी फाटा हा नागपूर पासून ३० कि.मी अंतरावर आहे. हे म्हणने खरे आहे की, शेत जमीनी नंतर वनविभागाची जमीन सुरु होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन ही कोरडवाहू होती आणि सदर जमीनीची किंमत ८० हजार प्रती हेक्टर पेशा जास्त नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या अर्जामध्ये आवास्तव , कोणत्याही आधारा शिवाय मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की जास्त पैसे मिळण्याच्या हेतुने खोटा अर्ज केला नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

दिनांक १०.१२.२०२५
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)